# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई

## *प्रारुपअधिसूचना*

**विद्युत अधिनियम, २००३**

**क्रमांक - मविनिआ/लीगल/२०१५/** - विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १८१ आणि कलम ९१ च्या उप-कलम (४) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच या संबंधात त्यास समर्थ करणाऱ्या अन्य सर्व अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग याद्वारे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, (सल्लागारांच्या नेमणुकीच्या अटी व शर्ती) विनियम, २००४ मध्ये सुधारणा करण्यासाठी खालीलप्रमाणे विनियम करीत आहे.

**१ संक्षिप्त शीर्षक, व्याप्ती आणि प्रारंभ**

(एक) या विनियमांना "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, (सल्लागारांच्या नेमणुकीच्या अटी व शर्ती) (पहिली सुधारणा) विनियम, २०१५" असे म्हणावे.

(दोन) हे विनियम शासकीय राजपत्रातील त्यांच्या प्रसिद्धिच्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. विनियम ३(१)(२) मध्ये सुधारणा :- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, (सल्लागारांच्या नेमणुकीच्या अटी व शर्ती) विनियम, २००४ च्या विनियम ३(१)(२) मध्ये खालील परंतुकाची भर घालण्यात येईल, म्हणजेच :-

*"परंतु असे की, एकाच स्त्रोतातून निवड केवळ अपवादात्मक प्रकरणांमध्ये करण्यात येईल, जेथे सल्लागारांनी पूर्वी केलेल्या कामाचे नैसर्गिक सातत्य राखण्यासाठी अशी निवड उचित आणि स्पष्टपणे लाभदायक असेल किंवा जेथे कालमर्यादेमुळे तातडीने नियुक्ती करणे आवश्यक असेल, किंवा छोट्या कामासाठी जेथे प्रत्येक प्रकरणी देय शुल्क रु.पाच लाखापेक्षा जास्त नसेल किंवा वार्षिक तत्वावर वैयक्तिक किंवा संस्थात्मक सल्लागार रिटेनरशिपवर नेमावयासाठी देय शुल्क रु. बारा लाखापेक्षा जास्त नसेल, किंवा जेथे केवळ एक संस्था किंवा व्यक्ती पात्र ठरेल किंवा त्याच्याजवळ कामाचा अनुभव असेल; मात्र अशी नियुक्ती करताना त्यासंबंधीची कारणे लेखी नोंदण्यात येतील."*

सचिव,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

मुंबई,
दिनांक : २ नोव्हेंबर, २०१५

सूचना :- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, (सल्लागारांच्या नेमणुकीच्या अटी व शर्ती) विनियम, २००४, हे विनियम दि. १० जून, २०१४ रोजी शासकीय राजपत्रात अधिसूचित करण्यात आले होते.